पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबई,
येथील मिनी थिएटर प्रायोगिक नाटकासाठी
सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक - पुलदे- २०१६/प्र.क्र.१७०/सां.का.-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ नोव्हेंबर २०१७.

<u>संदर्भ</u> :- (१) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. पुलदे-२०१३/ प्र.क्र.१३४/सां.का.- २, दि.०३/०३/२०१५.
(२) शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.पुलदे-२०१३/ प्र.क्र.१३४/सां.का.२, दि. ०४/०६/२०१५.
(३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. पुलदे-२०१६/ प्र.क्र.१७०/सां.का-२, दि.२१/०८/ २०१७.
(४) प्रकल्प संचालक पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई, यांचे पत्र क्र. पुलअ/४७२३, दि. १४/०९/२०१७.

<u>प्रस्तावना</u> :-

शासनाने संदर्भ क्र. १ येथील दि. ०३/०३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये पु.ल.देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी संकुलातील रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर इत्यादींचे भाडेदर निश्चित केले होते व त्याबाबतच्या अटी व शर्ती विहित केल्या होत्या. तद्नंतर संदर्भ क्र. २ येथील दि.०४/०६/२०१५ च्या शुध्दीपत्रकान्वये काही सुधारणा केल्या आहेत. तद्नंतर संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये अकादमीतील मिनी थिएटर प्रायोगिक नाटकांसाठी सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

आता अकादमीमध्ये चौथ्या मजल्या वरील एका वातानूकुलीत परिषद कक्षामध्ये (A. C. Conference Hall) पोडिअम, स्टेज व खुर्च्यांची प्रस्थापना करण्यात आली असून सदर कॉन्फरन्स हॉलचा (परिषद कक्ष) वापर कार्यशाळा, बैठका यासाठी करण्यात येणार आहे. सदर कॉन्फरन्स हॉलसाठी प्रत्येक दोन तासांच्या सत्रासाठी रु. २०००/- अधिक वस्तू व सेवा कर आकारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने सर्वकष विचार करून आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

पु.ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमीतील चौथ्या मजल्यावरील वातानूकुलीत परिषद कक्ष (A. C. Conference Hall) नव्याने सुरु करण्यात आलेला आहे. सदर कॉन्फरन्स हॉल (परिषद कक्ष) साठी प्रत्येक दोन तासाच्या सत्रासाठी रु.२०००/- अधिक वस्तू व सेवा कर, या दराने भाडे आकारणी करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. यासाठी संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय व संदर्भ क्र. २ येथील शुध्दीपत्रक याद्वारे निश्चित केलेल्या आवश्यक अटी/शर्ती व कार्यपध्दती लागू राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११२२१५०५४७२५२३ आहे. हा आदेश डिजीटन स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Basawaraj Gurapadappa Saidanawaru

Digitally signed by Basawaraj Gurapadappa Saidanawaru
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d6e0176dd9f18c05af2af6161c960ec128aedd0d596986c8dfe46407b1ecbc13, serialNumber=0c50ec125ac79b1ecf0a06b6a256996713c819ae428f2e0aabe4415bbcaf5a54, cn=Basawaraj Gurapadappa Saidanawaru
Date: 2017.11.22 15:09:24 +05'30'

(ब.गु.सैदानवरु)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे विशेष कार्य अधिकारी.

२) प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक.

३) प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई.

४) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई.

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

६) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

७) निवड नस्ती, सां.का.२.